महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७२५ /२०२४ दि. १५ /०७/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १७/०७/२०२४ रोजी **'मोहरम (ताजिया)'** सणानिमित्त मुस्लिम बांधवांतर्फे भव्य मिरवणूक काढण्यात येत असून मोठया प्रमाणात मुस्लिम बांधव सामील होत असतात. मिरवणुकीच्या वेळी सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) (अ) रांजनोली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड व मध्यम व हलकी वाहने त्यात कार, रिक्षा, दुचाकी वाहनांना **रांजणोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
(ब) एस.टी., के.डी.एम.टी., टी.एम.टी. बसेस यांना **रांजणोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** (अ) सदर जड, मध्यम व हलकी वाहने रांजणोली नाका येथे वळसा घेऊन मुंबई–नाशिक बायपास हायवे वरील मानकोली नाका येथून अंजुरफाटा किंवा वसई रोडने किंवा ओवळी खिंड येथून ओवळीगांव, ताडाळी जकातनाका, पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.
(ब) एस.टी./के.डी.एम.टी, टी.एम.टी. बसेस रांजणोली नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी भरून इच्छित स्थळी जातील व इतर वाहने रांजणोली नाका येथूनच वळसा घेऊन परत जातील.

**प्रवेश बंद –** २) अ) वाडा रोड मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना **अंबाडी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
ब) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पारोळफाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर जड, अवजड वाहने अंबाडी नाका येथूनच राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.
ब) तसेच हलकी वाहने पारोळ फाटा येथून उजवीकडे वळण घेऊन खोणीगांव, तळवली फाटा, कांबारोड या पर्यायी मार्गाने वसईरोड येथून डावीकडे वळण घेऊन कारीवली मार्गे इच्छित स्थळी जातील अथवा विश्वभारती फाटा येथूनच डावीकडे वळण घेऊन गोरसईगांव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस. टी. बसेससह **धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** (अ) सदर सर्व प्रकारची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे वळण घेऊन पाईपलाईन मार्गे वाडाकडे व पुढे इच्छित स्थळी जातील.
(ब) तसेच एस.टी. बसेस आपले प्रवासी चाविंद्रा जकातनाका येथे उतरवतील व तेथूनच प्रवासी घेऊन बस वळवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) (अ) मुंबई, ठाणे कडून जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम वाहनांना **अंजुरफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
ब) तसेच हलकी वाहने (कार, रिक्षा, दुचाकी वाहने), टी.एम.टी./एस.टी.बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो.स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** (अ) सदर जड वाहने वसई रोड मार्गाने कारीवली जकातनाका व विटभट्टीमार्गे इच्छित स्थळी जातील.
(ब) टी.एम.टी./एस.टी. आपले प्रवासी नारपोली पो.स्टे. येथे उतरतील व तेथूनच प्रवासी घेऊन परत जातील आणि हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग –** १) मिरवणूक मार्गावर ( शांतीनगर ते कॉटरगेट जकात नाका पर्यंत ) या रोडचे दोन्ही बाजुस कोणत्याही प्रकारचे वाहने पार्क करणेस मनाई आहे.
२) मिरवणुक मार्गावर ( भिवंडी नवी एसटी स्टॅन्ड ते कॉटरगेट जकातनाका येणारे जाणारे ) रोडवर कोणत्याही प्रकारचे वाहन पार्क करणेस मनाई आहे.

सदर अधिसूचना **'मोहरम (ताजिया)'** सणाच्या दिवशी म्हणजे **दि. १७/०७/२०२४ रोजी दुपारी १३:०० ते मोहरम मिरवणूक संपेपर्यंत** अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग
२/– म.न.पा.भिवंडी–निजामपूर शहरा च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.